R P A D.

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अभिविश्व कॉम्पलेक्स,**
**बोल्हेगांवफाटा, एम.आय.डी.सी., अहमदनगर.**
**पिन- ४१४१११, दुरध्वनी क्रमांक- ०२४१-२३२९३७८**
**Email: spldswo.nagar@gmail.com**

समता, न्याय, एकात्मता
महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय विभाग

जा.क्र.सआसक/नाहसं/माहितीअधिकार-२००५/लखबीर सारन/२०२०-२१ 9259 अहमदनगर दि.०५/०६/२०२० 99

प्रति,
श्री.लखबीर सारन
माणुसकी सेंटर,डेक्कन कॉलेज,
सदलबाबा बस स्टॅंड,येरवडा पुणे.

विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार माहितीबाबत
संदर्भ :- आपला माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गतचा दि. २६/०५/२०२० रोजी ईमेल वर प्राप्त अर्ज.

आपला उपरोक्त संदर्भीय अर्ज या कार्यालयास दिनांक २६/०५/२०२० रोजी प्राप्त झालेला असून ,सदर माहितीच्या अर्जान्वये आपण अनुसुचित जाती,जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ व सुधारित अधिनियम २०१५ अंतर्गत मागविलेली माहीती खालील प्रमाणे आहे.

| अ क्र | वर्ष | मागणी केलेली माहिती | या कार्यालयाकडे उपलब्ध माहिती |
|---|---|---|---|
| १ | १९९६-२०२० | 1. Kindly provide the year for which the report was prepared and submitted since 1996-2020 as per Rule 4(2) of Scheduled Caste Scheduled Tribes (PoA) Rule 1995 Specifically-"The District Magistrate and the Director of Prosecution/ in-charge of shall review at least twice in a calendar year in the months of January and July, the performance of Special Public Prosecutors so specified or appointed and submit a report to the state Government. | विशेष सरकारी वकील यांची नियुक्ती पीडितांच्या मागणी नुसार शासन स्तरावरून झाली असल्याने उपरोक्त नियमान्वये सहामाही व वार्षिक बैठक झालेली नाही परंतु विशेष सरकारी वकील यांची मानधन मंजुरीसाठी त्यांच्या कामकाजाविषयी वरिष्ठ कार्यालय यांच्या मार्गदर्शनाने शासनास कळविण्यात येते त्यानंतर त्यांना मानधन मंजूर करण्यात येते. तसेच प्रत्येक महिन्यातील जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती बैठकीत मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सर्व बाबींवर चर्चा केली जाते. |
| २ | २०१४-२०२० | 2. Also provide copies of said reports prepared and submitted since 2014-2020 please note that the information is related to the District Magistrate .if the information is not maintained and not availabale,kindly specify accordingly. | पीडितांच्या मागणी नुसार शासन स्तरावरून श्रीम.सर्वमित्रा वडमारे व आकाश मून यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करणेबाबत वरिष्ठ कार्यालय यांचेकडे शिफारस केलेबाबत पत्रे अनुक्रमे १) जा.क्र.सआस क/अन/नाहसं/निभ/२०१४-१५/२४६ अहमदनगर दि.२९/०१/२०१५<br>२)जा.क्र.सआसक/नाहसं/शेजवळवि.अ./वकीलनियुक्ती/२०१८-१९/ अहमदनगर ३३७५ दि.१४/०८/२०१८<br>सोबत: प्रत जोडली आहे. |

(पी.जी.वाबळे)
जन माहिती अधिकारी तथा,
सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,अहमदनगर.

(पी.जी.वाबळे)
जन माहिती अधिकारी तथा,
सहाय्यक आयुक्त समाज कल्याण,अहमदनगर.

प्रत माहितीस्तव...
१.गृह शाखा,जिल्हादंडाधिकारी कार्यालय,अहमदनगर.

# सहाय्यक आयुक्त,
# समाज कल्याण, अहमदनगर

अभिविश्व कॉम्पलेक्स, वाल्हेगांव फाटा, नगर मनमाड रोड, अहमदनगर दूरध्वनी क्र. ०२४१-२३२९३०८/२३२६३०९

जा.क्र.सआसक/अन/नाहस/नम/माडे/२०१४-१५/४८६

अहमदनगर दिनांक २०/३/२०१५

प्रति,

मा. ॲड. संघमित्रा वडमारे (चव्हाण)
प्रगत कॉलनी, मकाई गेट,
प्लॅट नं.१७, औरंगाबाद,
जि. औरंगाबाद

विषय :- शिंदे ता. कर्जत, जि. अहमदनगर दलित बांधवावर वारंवार होणाऱ्या केस नं.६१/२०१३ साठी ॲड संघमित्रा वडमारे (चव्हाण) सरकारतर्फे वकिलाची नेमणूक करणे बाबत.

संदर्भ :- १. मा. अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे पत्र क्र.पटीए-२०१४/प्रक्र ४९१/सामासु दि. १२/२/१५

२.मा.उपायुक्त (नाहसं) समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे /नाहसं/पी. सी. आर./अ.नगर/वकिल/२०१५/का-१२/३१२ दि. २६ जान २०१५

उपरोक्त संदर्भीय मा. अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शिंदे, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथील दलित बांधवावर वारंवार होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडून न्याय मिळणेसाठी केस नं. ६१/२०१३ साठी आपली नियुक्ती करण्याबाबत पुढील [illegible] खालील मुद्यांबाबत माहितीची विचारणा केलेली आहे.

१) आपणास न्यायालयात प्रकरणे हाताळण्याच्या कमीत कमी ७ वर्षांचा अनुभव आहे किंवा कसे.

२) आपले संमतीपत्र व आपल्या फि बाबतची माहिती कळविण्यात यावी.

३) या प्रकरणी संबंधीत न्यायालयीन कागदपत्रे या कार्यालयास लवकरात लवकर प्राप्त झाल्यास याचा मार्गदर्शन शासनास पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

तरी सदर प्रकरणी वरील तीन मुद्यांची माहिती तात्काळ या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(माधव वाघ)
सहाय्यक आयुक्त,
O/c समाज कल्याण अहमदनगर

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. श्री.सिध्दार्थ झाल्टे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

२. मा.उपआयुक्त(नाहसं), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नाशिक

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण अहमदनगर

O/c

**सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,अहमदनगर**
अभिविश्व कॉम्पलेक्स, बोल्हेगांव फाटा, एमआयडीसी, अहमदनगर,
पिन 414111 दुरध्वनी क्र.0241-2329378 Email: sdswoahm@gmail.com

जा.क्रं. सआसकअ/नाहसं/शेजवळ विनंतीअर्ज/वकीलनियुक्ती/२०१८-१९ अहमदनगर ३३७५ दिनांक १४/०८/२०१८

प्रति,

मा. सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषय :- सागर सुभाष शेजवळ गुन्हा र.नं. १०३/१५ स्पे.केस नं.६२/१५ अँट्रोसिटी खून प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून अॅड. आकाश बळवंत मुन यांची नियुक्ती होणे बाबत.**
संदर्भ :- आकाश सुभाष शेजवळ यांचा विनंती अर्ज दि.१३.८.२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, अनुसूचित जाती,जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदयाअंतर्गत पिडीत सागर सुभाष शेजवळ गुन्हा र.नं. १०३/१५ स्पे.केसनं.६२/१५ अॅट्रोसिटी खून प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून अॅड. आकाश बळवंत मुन यांची नियुक्ती होणे बाबत. विनंती अर्ज या कार्यालयास दि. १३.०८.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे.

**अॅड. आकाश बळवंत मुन यांची नियुक्ती होणे करीता खालील मुदद्यातील माहिती :**

**१. प्रस्तावित सरकारी शासकिय अभियोक्ता अॅड. आकाश बळवंत मुन यांना फौजदारी प्रकरणे हाताळण्याचा कमीत कमी दहा वर्षाचा अनुभव त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.**

**२. प्रस्तावित अभियोक्ता यांची फी अदा करणे बाबत कृपया अभिप्राय द्यावेत ही विनंती**

**३. प्रस्तुत प्रकरण विशेष सरकारी अभियोक्ता नियुक्त करण्या इतपत सार्वजनिक हिताचे आहे असे वाटते.**

सदर प्रकरणी अहमदनगर जिल्हयातील शिर्डी ता.राहाता येथे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत घडलेला गुन्हा शिर्डी पोलीस स्टेशन येथे दि.. १६/०५/२०१५ रोजी हा गुन्हा रजिष्टरनंबर १०३/१५ भादवि.कलम ३०२,३६३,३६६,१४७,१४८,१४९,३९५,२०१,अजाज ३(२)(५) प्रमाणे दाखल झालेला आहे. यागुन्हयांमध्ये श्री.सागर सुभाष शेजवळ वय वर्ष २२ हे मयत झालेले आहेत. सदर कुटूंबास सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दि.२१.८.२०१५ अन्वये यापुर्वी आर्थिक सहाय्य व मदतीबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.